# महात्मा ज्योतीबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF-२०२३)

## घोषणा

## कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया बाबत सदर सूचना कृपया व्यवस्थित वाचाव्यात.

महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर संस्थे अतंर्गत संशोधन अधिछात्रवृत्ती करिता महात्मा ज्योतीबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF-२०२३) करिता ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जातील माहितीच्या व महाज्योती कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे आपणास अधिछात्रवृत्ती करिता कागदपत्रे पडताळणी (Document Verification) करिता बोलविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाच्या व त्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याकरिता सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह (Original Documents) उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी करिता आपणास ई-मेल द्वारे बोलवण्यात येणाऱ्या ई-मेल मधील नमुद महाज्योती कार्यालयाचा दिनांक व पत्ता येथे उपस्थित राहावे.

**अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात, या कार्यालयास पाठविलेल्या कागदपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवश्यक प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पूर्तता न केल्यास MJPRF-२०२३ च्या मार्गदर्शक तत्वानुसार मुळ कागदपत्रे पडताळणी (Original Document Verification) करताना / प्रमाणपत्र तपासताना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

# मुळ कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया करिता सुचना व कागदपत्रे

**अर्जदारांनी खालील सर्व नमुद कागदपत्रांच्या मुळप्रती व त्यांच्या स्व:साक्षांकित प्रतीचा (Self Attested) १ झेरॉक्स संच सोबत घेऊन यावे.**

| अ. क्र. | सादर करावयाची मूळ कागदपत्रे (ऑनलाईन अर्जानुसार) |
|---|---|
| १. | **Cover Page (Annexure - II See Attachment)** |
| २. | **प्रपत्र ब ( See Attachment)** |
| ३. | महाज्योतीमध्ये  नोदणी केलेल्या ONLINE अर्जाची प्रत |
| ४. | प्रतिज्ञापत्र (मा.दंडाधिकारी यांच्या कोर्टात Affidavit करुन मुळ प्रतीत सादर करावे) |
| ५. | उमेदवाराचे आधार कार्ड |
| ६. | Pan Card |
| ७. | उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| ८. | उमेदवाराचा जातीचा दाखला |
| ९. | उमेदवाराचे वैध नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र |
| १०. | उमेदवाराचे १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ११. | उमेदवाराचे १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १२. | उमेदवाराचे पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १३. | उमेदवाराचे पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १४. | उमेदवाराचे NET/SET/PET परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १५. | उमेदवाराने पीएचडी करिता प्रवेश घेतल्याची पावती /पत्र |
| १६. | उमेदवाराचे पीएचडीकरिता नोंदणी पक्की झाल्याचे प्रमाणपत्र (Confirmation letter) |
| १७. | RAC/RRC ने मान्यता दिलेला संशोधन सारांश (Synopsis/Proposal) |

| अ. क्र. | सादर करावयाची मूळ कागदपत्रे (ऑनलाईन अर्जानुसार) |
|---|---|
| १८. | संशोधन केंद्रात संशोधनासाठी रुजू झाल्याचे पत्र(Joining/Bonafide |
| १९. | दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास) |
| २०. | नावात बदल असल्यास त्याचा पुरावा (Change in Name - Gazzette) |
| २१. | B+ मानांकन प्राप्त शासकीय विद्यापीठ/A मानांकन प्राप्त खाजगी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्याबाबतचा पुरावा.(सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांचा दि.३०.१०.२०२३ च्या शासन निर्णयानुसार) ज्या विद्यापीठात प्रवेश घेतलेला आहे त्याचे NAAC प्रमाणपत्र अथवा असे कागदपत्र की, ज्यावरून विद्यापीठाला NAAC चे मानांकन असल्याचे दिसून येते. |

पुन्हा एकदा निदर्शनास आणण्यास येते की, आपली मूळ कागदपत्र पडताळणी प्रक्रिया एकदाच करण्यात येणार असून आपल्या मार्गदर्शनास्त्व उपरोक्त सूचना आपल्या हिताकरिता व्यवस्थितपणे वाचाव्यात व उपरोक्त प्रमाणे सर्व कागदपत्रासह मूळ कागदपत्र पडताळणी करिता सोबत जोडण्यात आलेल्या यादीप्रमाणे नेमून दिलेल्या दिवशी व विहित वेळेतच उपस्थित राहावे.

## Venue of the Document Verification: -

**Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI),Nagpur**
**Dr. Babasaheb Ambedkar Samajik Nyay Bhavan,**
**MA/15/1, S Ambazari Rd, Vasant Nagar,**
**Nagpur, Maharashtra 440022**